# विद्यापीठात कबड्डीचा थरार

## आंतरविद्यापीठ स्पर्धेला प्रेक्षकांचीही मिळाली पसंती

Sachin.patil1
@timesgroup.com
Tweet : sachinpMT

अर्जुन टाकळकर



पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेतील चुरशीचा एक क्षण.

**कोल्हापूर :** चढाई आणि पकडीचे अद्भुत कौशल्य, डोळ्याचे पाते लवते न् लवते तोच मॅटवर होणाऱ्या चपळ हालचाली, चारही बाजूंनी होणाऱ्या चढाया असा नेत्रसुखद अनुभव शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत क्रीडारसिकांना येतो आहे. लोककला केंद्रात सोमवारपासून स्पर्धेला सुरुवात झाली. शुक्रवारपर्यंत (ता. ३०) स्पर्धा सुरू राहणार आहे. स्पर्धेत पश्चिम विभागातील ६४ विद्यापीठांचे ७६८ खेळाडू सहभागी झाले आहेत.

विद्यापीठ प्रशासनाने स्पर्धेचे नेटके नियोजन केले आहे. लोककला केंद्रामध्ये चार मॅटिंग कोर्ट तयार केले आहेत. संघांना सरावासाठी दोन अतिरिक्त मॅटिंग कोर्ट आहेत. स्पर्धेत अडथळे येऊ नयेत यासाठी कोल्हापूर जिल्हा कबड्डी संघटनेच्या ४० सामना अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. एकूण १३६ प्रशिक्षक, व्यवस्थापकांसह ५० पंच कार्यरत आहेत. बाहेरून येणाऱ्या संघांच्या निवासाची सोय पाच बंगला, विद्यापीठातील वसतिगृहे व अन्य निवासस्थानांमध्ये केली आहे. नियोजनासाठी प्रशासकीय समित्या कार्यरत आहेत.

### टाळ्या, उत्साह आणि इर्ष्या

लोककला केंद्रात सकाळी ८ वाजता कबड्डीचे सामने सुरू होतात. स्पर्धेचा आनंद लुटण्यासाठी क्रीडारसिक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. अलीकडे प्रो कबड्डीसारख्या स्पर्धांमुळे खेळाला मिळणारा प्रतिसाद वाढत आहे. सकाळी, दुपारी व संध्याकाळच्या सत्रांत सामने पहायला गर्दी होत आहे. त्यामुळे पारंपरिकतेबरोबर अत्याधुनिकतेची कास धरणारा कबड्डी खेळ अनुभवायला मिळत आहे. सध्याचा माती, हिरवळीच्या मैदानावरून थेट मॅटवर झालेला कबड्डीचा प्रवेश खेळाडूंना ग्रीप देणारा ठरतो आहे. खेळाडूंची रग, आक्रमकता, खेळातील कौशल्य आकर्षित करणारे ठरत आहे. सामन्यांदरम्यान खेळाडूंच्या पल्लेदार चढाया लक्ष वेधून घेतात. प्रत्येक संघ जोशपूर्ण उत्साहात विजयासाठी आसुसलेला दिसतो. अप्रतिम पकड, चाहत्यांचे प्रोत्साहन यामुळे खेळातील उत्कंठा वाढत आहे. राष्ट्रीय स्पर्धेसाठी ही स्पर्धा महत्वाची असल्याने संघामध्ये कमालीची चढाओढ अनुभवायला मिळते.

### दिव्यांग मनीष सिंगवर अधिक लक्ष

वयाच्या दहाव्या वर्षी शॉक लागून त्याला उजवा हात गमवावा लागला. प्रतिकूल परिस्थितीत त्याने स्वतःला घडवत कबड्डीत राष्ट्रीय स्तरावर मजल मारली आहे. मनीषसिंग चव्हाण असे या खेळाडूचे नाव आहे. तो उदयपूर (राजस्थान) येथील भोपाल्स नोबल युनिवर्सिटीत बी.ए. भाग १ मध्ये शिकत आहे. जिल्हा आणि राज्यस्तरावर दमदार कामगिरी केलेल्या मनिषची निवड राजस्थान प्रो कबड्डी स्पर्धेसाठी झाली आहे. गोवर्धन विलास स्पर्धेत पहिल्या वर्षी मनीषचा संघ पराभूत झाला होता. पण वर्षभरात त्याच्या संघाने पुनरागमन करत स्पर्धेत अजिंक्यपद पटकावले. त्याला बॉडी बिल्डिंगमध्ये रस असून कबड्डीमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करण्याचे त्याचे स्वप्न आहे. सध्या तो प्रशिक्षक देवेंद्रसिंग अर्निया यांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डीचे धडे गिरवत आहे.



आंतरविद्यापीठ स्तरावरील कबड्डी स्पर्धा अत्यंत महत्वाच्या आहेत. यंदा स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. बलाढ्य संघातील लढती चुरशीच्या ठरत आहेत. बादफेरी संपून साखळी पद्धतीचे सामने सुरु होत आहेत. स्पर्धेतील पहिले चार संघ राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करतील. स्पर्धेमुळे नवे खेळाडू तयार होण्यास मदत होणार आहे.

**– डॉ. पी. टी. गायकवाड,**
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण



कबड्डीसाठी दर्जेदार असे मॅट मैदान तयार करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठात खेळासाठी उत्साहाचे वातावरण आहे. त्यामुळे सामन्यात रंगत येत आहे. खेळाडूंना सर्व प्राथमिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अनेक बलाढ्य संघाबरोबर होणाऱ्या लढतींमुळे स्वतःच्या क्षमता तपासायला वाव मिळत आहे.

**– खेमचंद भोई,** खेळाडू, जळगाव विद्यापीठ

# शिवाजी, मुंबई, बामू कोटा राष्ट्रीय स्पर्धेत

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत बुधवारी झालेल्या सामन्यांमध्ये यजमान शिवाजी विद्यापीठासह मुंबई विद्यापीठ, औरंगाबादचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि कोटा विद्यापीठ या चार संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवित राष्ट्रीय स्पर्धेतील स्थान निश्चित केले.

**आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा**

शिवाजी विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठ यांच्यात अतिशय चुरशीने झालेल्या सामन्यात गैरवर्तन करीत सोलापूरच्या खेळाडूंनी सामना सोडला. त्यामुळे ३५ विरुद्ध १९ गुणांनी आघाडीवर असलेल्या कोल्हापूरला विजयी घोषित करण्यात आले. पुणे विद्यापीठ आणि कोटा विद्यापीठ यांच्यातील लढतीत कोटाने पुण्यावर ३९-३७ असा अगदी निसटता विजय मिळविला. मुंबई विद्यापीठाने नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संघाला ४७-३४ असे हरवले. औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठने पंडित दीनदयाळ उपाध्याय शेखावती विद्यापीठ संघावर ४५-४१ असा विजय मिळवला. या चारही विजेत्या संघांचा राष्ट्रीय स्पर्धेतील प्रवेश निश्चित झाला.

सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठाने गोवा विद्यापीठ आणि भोपाळच्या संघाचा पराभव केला. नांदेडच्या संघाने राजस्थानच्या भूपाल नोबल्स विद्यापीठ आणि सूरतच्या वीर नर्मदा दक्षिण गुजरात विद्यापीठाचा पराभव केला. औरंगाबादच्या संघाने जबलपूरच्या राणी दुर्गावती विद्यापीठाच्या संघाचा आणि अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या संघावर मात केली. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाला मात्र कोटा विद्यापीठाकडून ५६-३१ असा पराभव पत्करावा लागला.

इतर फेरीतील विजयी संघ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, वीर नर्मदा दक्षिण गुजरात विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, कोटा विद्यापीठ, कोटा, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, राजीव गांधी प्रद्योगिकी विश्वविद्यालय, भोपाल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, कोटा विद्यापीठ, कोटा, स्वामी रामानंद तीर्थ महाराज विद्यापीठ, नांदेड, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,